# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई

( स्थापना १९४७ )

( सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ [मुंबई]
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६ / २५-६-१९४९ )

# त्रैवार्षिक अहवाल

## १ जानेवारी १९८३ ते ३१ डिसेम्बर १९८५

★

अमरवाडी,
गोखले पथ ( उत्तर ),
दादर, मुंबई-४०० ०२८.
दूरध्वनी : ४२२३५८९.

बुक-पोस्ट

श्री./श्रीमती

प्रेषक :
अमर हिंद मंडळ, दादर,
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई-४०० ०२८.

एकविरा प्रिंटर्स, ३९, ज्ञान मंदीर रोड, गोखले रोड (नॉर्थ), दादर, मुंबई-४०० ०२८.

# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई

[ स्थापना १९४७ ]

**: विश्वस्त :**

श्री. ना. के. पडते
श्री. स. म. पुळेकर
डॉ. सुहास कुलकर्णी

अध्यक्ष—नामदार बॅ. विठ्ठलराव न. गाडगीळ
उपाध्यक्ष— श्री. शि. घों. वेलणकर
,, श्री. म. पु काटघरे

**: कार्यकारी समिती :**

कार्याध्यक्ष—श्री. मु. आ. तिवरेकर
कार्योपाध्यक्ष—श्री. ना. रा. नाबर
कार्यवाह—श्री. न. ज. मयेकर
संयुक्त कार्यवाह—श्री. श्री. का. भोसले
कोषाध्यक्ष—श्री. ड. व्यं. शेणॉय

**: सभासद ;**

श्री. हरिश्चंद्र गं. राणे
,, गो. स. आवलक
,, दि. आ. पालेकर
,, श्री. सि. पुराणिक
,, शि. रा. गोताड (२७-१२-८५ पर्यंत)
,, शा. द. चुरमुरे (१८-२-८६ पर्यंत)
,, वि. शं. मांढरे (२५-३-८६ पासून)

श्री. पां वि. पाटील (२३-६-८५ पर्यंत)
,, दि. शं. पाटील
,, म. र. कुपेरकर
,, स. श. रेडीज
,, य. गो. कामत (२१-११-८५ पासून)
,, शां. ह. शिरवडकर (१८-२-८६ पासून)

# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई

## वार्षिक सर्वसाधारण सभा-सूचना [ Notice ]

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २६-१०-१९८६ रोजी सकाळी ९-३० वाजता मंडळाच्या सभागृहात मंडळाचे अध्यक्ष :– नामदार बॅ. **विठ्ठलराव गाडगीळ**, माहिती व प्रसारण राज्य मंत्री, भारत सरकार, दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना-नियमानुसार त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने होईल.

**— सभेपुढील कामे —**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) त्रैवार्षिक अहवाल वाचून मंजूर करणे [ १९८३, १९८४ व १९८५ चा ].
३) १९८३, १९८४ व १९८५ चे हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.
४) सन १९८५ व १९८६ सालासाठी हिशेब तपासनीस नेमणे व त्याचे मानधन ठरविणे.
५) नवीन बांधकाम योजनेसंबंधी विचार करून निर्णय घेणे.
६) १९८६ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
७) मुदत ठेवीतील रक्कम इमारत निधी म्हणून वर्ग करण्यासाठी ठराव करणे.
८) मुंबई उच्च न्यायालयातील मंडळाच्या अपिल केसच्या बाबतीत झालेल्या कन्सेन्ट टर्मस्ना मान्यता देणे.
९) विश्वस्त श्री. स. म. पुळेकर यांच्या राजिनाम्याच्या पत्रावर विचार करणे व आवश्यक झाल्यास नवीन विश्वस्ताची निवड करणे.
१०) पुढील ३ वर्षासाठी एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष व कार्यकारी समितीवरील अकरा सभासदांची निवड करणे.
११) अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने,
**न. ज. मयेकर**
कार्यवाह

दिनांक ६-१०-१९८६

**सूचना :–** १) कार्यकारी समितीवरील सभासदांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत दि २३-१०-१९८६ रोजी रात्रौ ८ वाजेपर्यंत स्वीकारले जातील. निवडणुक आवश्यक झाल्यास वार्षिक सभेच्याच दिवशी होईल.
२) अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड वार्षिक सभेच्याच दिवशी होईल.
३) निवडणुक सुरू होण्यापूर्वी उमेदवारीचा अर्ज मागे घेता येईल.
४) ज्या सभासदांना हिशेबाविषयी माहिती पाहिजे असेल त्यांना ती कचेरीच्या वेळात दिनांक २३-१०-१९८६ पर्यंत मिळेल.
५) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील, त्यांनी ते लेखी दिनांक २३-१०-१९८६ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात कचेरीच्या वेळात [ सायंकाळी ६ ते ८ पर्यंत ] आणून द्यावेत.

# अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई

# त्रैवार्षिक अहवाल

## १ जानेवारी १९८३ ते ३१ डिसेम्बर १९८५

---

सन्माननीय सभासद बंधू भगिनी यांस,

प्रारंभी वार्षिक सर्वसाधारण सभेस विलंब झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून मंडळाच्या १९८३, १९८४, व १९८५ या तीन वर्षांच्या काळातील कार्याचा अहवाल आणि मंडळाच्या नियुक्त हिशेब तपासणीसानी तपासलेले हिशेब आम्ही आपणांस सादर करीत आहोत.

१९८३ ते १९८५ या तीन वर्षाच्या काळातील मंडळाचे कार्य व कारभार आम्ही योग्य प्रकारे करण्याचा प्रयत्न केला. मंडळाच्या आर्थिक व्यवहारात वाढ होऊन मंडळाच्या नांवे इमारत निधीसाठी मुदत ठेवीत १९८५ अखेरपर्यंत एकूण रु. १,००,०००/– [ एक लाख ] रक्कम गुंतविण्यात आलेली आहे वार्षिक वसंत व्याख्यानमाला, दुर्गचित्रप्रदर्शन, विनामूल्य वैद्यकीय– सेवा शिबिर, खो-खो स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे / कार्यक्रमांचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले. मंडळाचे सभागृह व मैदान याची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने खास दुरुस्ती / सुधारणा करण्यात आल्या.

कार्यकारी समितीच्या १९८३ साली १२, १९८४ साली ९ व १९८५ साली ११ सभा झाल्या. त्यापैकी ४ सभा मंडळाचे विश्वस्त, उपाध्यक्ष व कार्यकारी समिती यांच्या संयुक्त सभा झाल्या. विश्वस्त व कार्यकारी समितीचे पदाधिकारी यांची सुद्धा एक विशेष सभा झाली. सभाना उपस्थिती समाधानकारक होती आणि बहुतेक सर्व निर्णय / ठराव सर्वानुमतेच घेण्यात आले.

वरील तीन वर्षाच्या काळात मंडळाचे एकूण १३ नवीन तहहयात सभासद झाले.

मंडळाच्या वतीने मुंबईत प्रथमच महाराष्ट्रातील ऐतिहासिक दुर्गांच्या विस्तारित चित्रांचे एक आकर्षक प्रदर्शन मंडळाच्या सभागृहात दि. ५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी १९८३ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. मंडळाच्या या उपक्रमाला चांगली प्रसिद्धी मिळून लोकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. प्रदर्शन प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकांनी आपल्या संतोषाची नोंद केली व



अशा प्रकारचे प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल मंडळाला धन्यवाद दिले. या दुर्गचित्र प्रदर्शनाचे आयोजन महाराष्ट्रात अनेक ठिकाणी यशस्वीरीत्या करण्यात आले. या बाबतीत सदर दुर्गचित्र प्रदर्शनाचे कार्यक्रम करू इच्छिणाऱ्या संस्था / व्यक्ती जर सर्व जबाबदारी घेणार असतील व मंडळावर आर्थिक वा अन्य कोणत्याही प्रकारे जबाबदारी येणार नसेल तर मंडळाचे सभासद श्री चंद्रकांत गणपुले यांच्या मार्गदर्शनानुसार असे कार्यक्रम करण्यास हरकत नसावी असे कार्यकारी समितीचे धोरण होते. भारतीय लष्कराच्या एन्. सी. सी विभागासाठी त्यांच्या विनंतीवरून हे दुर्गचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. इतकेच नव्हे तर अंदमान येथे सुद्धा या दुर्गचित्र प्रदर्शनाचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रारंभी मंडळाला एकूण रु. १४,०००/– [ रुपये चौदा हजार मात्र ] खर्च झाला आणि रु. ३०००/- ( रुपये तीन हजार मात्र ) उत्पन्न मिळाले. अनेक ठिकाणी झालेल्या दुर्गचित्र प्रदर्शनाच्या कार्यक्रमातून मंडळाला कांही आर्थिक लाभ झालेला नाही. परंतु मंडळाच्या या कार्यामुळे मंडळाचे नावलौकिक व प्रतिष्ठा द्विगुणित झाली यात शंका नाही. आर्थिक लाभाच्या दृष्टीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले नव्हते. या कार्यक्रमाच्या बाबतीत मंडळाचे तहहयात सभासद श्री. चंद्रकांत गणपुले आणि त्यांचे गिर्यारोहण प्रेमी सहकारी यांचे फार मोठे सहाय्य व सहकार्य लाभले हे नमूद करणे आवश्यक आहे.

मंडळाच्या वार्षिक वसंत व्याख्यानमालांचा कार्यक्रम तीनही वर्षात समाधानकारकरीत्या पार पडला. मंडळाची ३६ वी वसंत व्याख्यानमाला शनिवार दि. ९ एप्रिल १९८३ पासून शनिवार दि. १६ एप्रिल १९८३ पर्यंत झाली. अचानक आलेल्या पावसामुळे एक व्याख्यान होऊ शकले नाही. मंडळाची ३७ वी वसंत व्याख्यानमाला शनिवार दि. ७ एप्रिल १९८४ पासून बुधवार दि. १८ एप्रिल १९८४ पर्यंत झाली. व्याख्यानमालेतील एक व्याख्याते प्रा. राम शेवाळकर हे आजारपणामुळे व्याख्यान देण्यासाठी येऊ न शकल्यामुळे प्रा. घों. वि. देशपांडे यांनी आयत्यावेळी पूर्व नियोजित विषयावरच दि. १४–४–८४ रोजी विचारप्रवर्तक व्याख्यान देऊन सर्वांना आश्चर्याचा गोड धक्का दिला. त्याचप्रमाणे प्रा. सदा कऱ्हाडे यांनी सुद्धा प्रा. राम शेवाळकर यांच्या अनुपस्थितीमुळे रवि. १५–४–८४ रोजी 'मराठी साहित्याची उपयुक्तता' या विषयावर माहितीपूर्ण व उद्बोधक व्याख्यान दिले. त्यांच्या या अमूल्य सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत. मंडळाची ३८ वी वसंत व्याख्यानमाला शनिवार दि. १३ एप्रिल १९८५ पासून सोमवार दि. २२ एप्रिल १९८५ पर्यंत झाली. ज्ञान, प्रबोधन आणि मनोरंजन या दृष्टिकोनातून व्याख्यानमालांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आणि तीनही वर्षांच्या वसंत व्याख्यानमाला या दृष्टीने यशस्वीरीत्या पार पडल्या. लोकांचा प्रतिसादही समाधानकारक होता. मंडळाला या कार्यक्रमाद्वारे काही आर्थिक लाभ व्हावा अशी अपेक्षा नव्हती आणि म्हणून या कार्यक्रमांसाठी नाम मात्र प्रवेश शुल्क आकारण्यात आले होते.

मंडळाच्या वतीने रविवार दि. १७ फेब्रुवारी १९८५ रोजी दुसरे विनामूल्य दंत चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कामी मंडळाचे विश्वस्त डॉ. सुहास कुलकर्णी यांचे व अन्य सात सेवाभावी तज्ञ डॉक्टरांचे अमूल्य सहाय्य व सहकार्य लाभले. त्या विनामूल्य वैद्यकीय सेवेचा लाभ २०० हून अधिक नागरिकांनी घेतला. मुंबईतील नामवंत औषधी कंपन्यांकडून-सुद्धां आमच्या या उपक्रमासाठी चांगले सहाय्य मिळाले. मंडळाच्या या कार्याची चांगली प्रशंसा झाली.

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २५-१२-८३ रोजी झाली. या सभेत मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व कार्यकारी समिती (सध्याची) यांची १९८४, ८५ व ८६ या तीन वर्षासाठी निवड करण्यात आली. सदर सभेचे इतिवृत्त आपल्या संमतीसाठी सादर करण्यात आले आहे.

मंडळाच्या सध्याच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकारी समितीची मुदत १९८६ अखेर पर्यंत आहे आणि ही मुदत पुरी होण्यास अल्प कालावधी आहे हे लक्षात घेवून पदाधिकाऱ्यांची व कार्यकारी समितीची निवड याच वार्षिक सभेत व्हावी असा कार्यकारी समितीने निर्णय घेतला आणि यानुसार सभेपुढील कामात या विषयाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

मंडळात होणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या वेळी खाद्य, पेये, विद्युत रोषणाई इत्यादींची सोय करण्यासाठी "मेसर्स तृप्ती कॅटरर्स ॲण्ड डेकोरेटर्स" यांच्याशी एक वर्षापुरता करारनामा करण्यात आलेला असून त्याबद्दल मंडळाला मे. तृप्ती केटरर्स ॲण्ड डेकोरेटर्सकडून रु ६५,०००/- (रुपये पासष्ट हजार मात्र) मिळाले.

मंडळाचे सभागृह व मैदानाच्या भाड्यात वाढ करण्याचा निर्णय कार्यकारी समितीने घेतला असून सध्या सबंध दिवसासाठी रु. ५००/- (पांचशे) भाडे आकारण्यात येते व रु. १००/- (शंभर) अनामत रक्कम घेण्यात येते.

ऑक्टोबर १९८५ पासून एका व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

३८ व्या वसंत व्याख्यानमालेत डॉ. देवेंद्र व्होरा यांचे "ॲक्युप्रेशर ट्रीटमेंट (प्रात्यक्षिकांसहीत)" या विषयावर रविवार दि. २१-४-८५ रोजी सकाळी खास व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानाला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉक्टरांचे व्याख्यान फारच प्रभावी झाले. उपस्थित नागरिकांनी "अशा प्रकारच्या ट्रीटमेंटची सोय मंडळात व्हावी" अशी आग्रहाची वारंवार विनंती केली. त्याला अनुसरून डॉ. व्होरा यांनी ॲक्युप्रेशर ट्रीटमेंटमध्ये प्रशिक्षित केलेले मंडळाचे तहहयात सभासद श्री. हिम्मतभाई भट यांना मंडळामध्ये दर रविवारी विनामूल्य ॲक्युप्रेशर ट्रीटमेंट सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली.



मंडळाच्या महिला खो खो संघाने मुंबईतील तसेच राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध खो खो स्पर्धांमध्ये भाग घेऊन नेत्रदीपक यश संपादन केले. मंडळाच्या महिला खो खो संघाची प्रसिद्धी व प्रतिष्ठा खूपच वृद्धिंगत झाली. आणि खो खो क्रीडा क्षेत्रात मंडळाच्या महिला संघाला विशेष स्थान प्राप्त झालेले आहे. खेळाडूंना सतत प्रोत्साहन देऊन त्यांना सर्वतोपरि सहाय्य करण्याचा मंडळाचा प्रयत्न असतो. क्रीडा विभागावर मंडळाने अहवाल काळामध्ये एकूण रु. १८९३४ खर्च केलेला आहे. विशेष म्हणजे मंडळाच्या वतीने मंडळाच्या मैदानावर जानेवारी १९८६ मध्ये ज्युनियर व सब ज्युनियर खो खो जिल्हा पातळीवरील स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि सबज्युनिअर स्पर्धेसाठी मंडळाच्या नावे कायम स्वरूपाची फिरती ट्रॉफी मुंबई खो खो संघटनेकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सभागृह / मैदान व इमारत यांची व्यवस्था दुरुस्ती इ. साठी मंडळाला वाढता खर्च करावा लागला हे हिशेबपत्रकातील आकड्यांवरुन आपल्या ध्यानात येईल. हे काम आता भारी खर्चाचे तसेच अवघड झाले आहे.

नवीन बांधकाम योजनेचे (पुनर्रचना व वाढ) प्लान्स पास झाले. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडे रु. ८०५० (आठ हजार पन्नासची) अनामत रक्कम भरावी लागली. सदर पास झालेल्या प्लॅन्सचे नूतनीकरण करून घेण्यात आलेले आहे. हा विषय आपल्या विचारासाठी व निर्णयासाठी ठेवण्यात आलेला आहे. तरी या बाबतीत पूर्ण विचारांती योग्य निर्णय घेण्यांत यावा.

मंडळाच्या अपील केसची सुनावणी १९८६ मध्ये होऊन न्यायमूर्तींच्या सूचनेनुसार व आपल्या वकिलांच्या सल्यानुसार तडजोडीच्या मसुद्याला (Consent terms) मान्यता देण्यात आली. सदर Consent terms ना वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता मिळावी म्हणून एक ठराव आपल्या सम्मतीसाठी सादर करण्यात येत आहे. तो आपण सर्वानुमते संमत करावा ही विनंती.

गेल्या तीन वर्षांच्या काळातील कार्याचा हा त्रोटक अहवाल आणि हिशेब आपणास समाधानकारक वाटतील असा विश्वास वाटतो. आपल्या सततच्या व सक्रीय सहकार्याची अपेक्षा आहेच.

वसंत व्याख्यानमालेतील सर्व व्याख्यात्यांचे, दंतचिकित्सा शिबीराच्या कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या सर्व डॉक्टरांचे (डॉ. निसार मर्चंट, डॉ. सुधीर मायदेव, डॉ. उज्वल शहा, डॉ. सुभाष प्रधान, डॉ. सुहास कुलकर्णी, डॉ. जयंत जोगळेकर व डॉ. सुलभा हळवे) व औषधी कंपन्यांचे, दादर फ्रीहेल्थ सेंटर, किर्ते भंडारी हॉल,दादर, दुर्ग चित्र प्रदर्शनाचा कार्यक्रम यशस्वी-

रीत्या आयोजित करण्याच्या बाबतीत ज्यांचे उत्स्फूर्त सहाय्य झाले ते श्री. चंद्रकांत गणपुले यांचे आणि त्यांच्या गिर्यारोहणप्रेमी सहकाऱ्यांचे, थोर इतिहास संशोधक व लोकप्रिय वक्ते श्री. सेतू माधवराव पगडी यांचे, [त्यांच्या स्फूर्तीदायक व्याख्यानानेच दुर्गचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.] मुंबईच्या पोलिस आयुक्तांचे, दादर पोलिस स्टेशनचे, तसेच सर्व मराठी वर्तमान पत्रांचे मंडळाच्या वतीने आभार. तसेच सर्व सभासद बंधु-भगिनींचे, हितचिंतक, मित्रमंडळीचे आभार.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
**न. ज. मयेकर**
कार्यवाह

# अमर हिंद मंडळ आयोजित

— विनामूल्य —

# ॲक्युप्रेशर ट्रीटमेंट

## दर रविवारी
## दुपारी तीन ते पाच वाजेपर्यंत

चिकित्सक :
**श्री. हिंमतभाई भट**